# पंगुं लंघयते गिरिम्!

**चंद्रशेखर पुरंदरे**

**पॅरालिंपिक्स**

आदर्श समाजात 'मुख्य प्रवाह' ही संकल्पनाच अप्रस्तुत ठरावी. वास्तवात तेवढ्या सर्वसमावेशक व्यवस्थेपर्यंत जगातला कोणताच समाज पोचलेला नाही. पण किमान त्या दिशेला जाण्याचा सामूहिक प्रयत्न असेल तर तो स्तुत्य व श्रेयस्कर उपक्रम ठरतो. २०१२ चे मुख्य ऑलिंपिक पार पडल्यावर ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात अपंगांसाठीचे पॅरालिंपिक्स लंडनमध्ये सुरू झाले. हा असा उपक्रम.

समाजातील दुबळ्या स्तराला मुख्य प्रवाह कसा वागवतो यावरून समाजाची प्रगल्भता कळते. भौगोलिक निवासस्थान, दारिद्र्य, वर्ण, वंश, जात, वय याबरोबरच अपंगत्व हेही सामाजिक दुबळेपणाचे एक कारण आहे. पण काही वेळा अपंगत्व हा आयुष्यभराचा शाप राहू नये इतपत वैद्यकीय तंत्रज्ञान आता पुढे गेले आहे.

पॅरालिंपिकमध्ये फक्त अपंग सहभागी होतात. अंध, एक किंवा दोन्ही हात, पाय तुटलेले किंवा नसलेले, कमरे-खालचे शरीर लुळे असणारे, अगदी गर्भावस्थेतच झालेल्या मेंदूच्या विकाराने शरीराची नीट वाढ न झालेले असे अनेक प्रकारचे ४२०० अपंग १६४ देशातून पॅरालिंपिकला आले. हे खेळाडू (दोन्ही कृत्रिम पायांवर) धावण्याच्या शर्यतीत उतरले, दोन्ही हात किंवा पाय नसताना पोहले, व्हीलचेअरवरून बास्केटबॉल, टेनिस खेळले - ज्युडोपासून घोडेस्वारीपर्यंत सगळे खेळ यात होते. विशेष म्हणजे बऱ्याच खेळांची कॉमेंटरी करणारे टीव्हीचे प्रतिनिधीही अपंग होते.

अर्थात अशा जगड्व्याळ प्रकल्पाबद्दल वादंग निर्माण होणे अपेक्षितच आहे. ते सुरूही झाले. प्रत्यक्ष वादंगापेक्षा त्यातून मिळणारे सामाजिक संकेत उद्‌बोधक आहेत.

उदाहरणार्थ, अजूनही मुख्य प्रवाह अपंगांना दुय्यम कसा मानतो हे टीव्ही प्रक्षेपणावरून लक्षात आले. मुख्य ऑलिंपिकचा संपूर्ण सोहळा ब्रिटनमध्ये BBC ने दाखवला. BBC वर जाहिराती नसतात. प्रत्येक ग्राहकाच्या टीव्ही लायसन्सच्या फी वर BBC चालते. इतर चॅनेल्स जाहिरातींवर चालतात. पॅरालिंपिक्सचे प्रक्षेपण चॅनल फोर (Channel Four) या व्यावसायिक चॅनेलने केले. त्यामुळे खेळाचे प्रक्षेपण दहा मिनिटे आणि जाहिरातींसाठी 'ब्रेक' अर्ध्या तासाचा असे प्रक्षेपण झाले. ज्या कंपन्यांचा अपंगांच्या प्रश्नांशी किंवा पुनर्वसनाशी काहीही संबंध नाही त्यांनीही व्यावसायिक फायद्यासाठी जाहिराती केल्या.

दुसरा मुद्दा स्पॉन्सरशिपचा. एवढा मोठा प्रकल्प स्पॉन्सरखेरीज शक्य नसतो. ATOS नावाची आयटी क्षेत्रातील फ्रेंच कंपनी २००१ पासून पॅरालिंपिकची प्रमुख स्पॉन्सर आहे. याच कंपनीचा एक विभाग आरोग्यसेवेच्या क्षेत्रात आहे. ब्रिटनमध्ये वादंग माजले ते ATOS च्या या विभागाच्या कारभारावरून. ब्रिटिश सरकारचे अलिकडचे धोरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रावरील सरकारी खर्चात कपात करणे. ज्या अपंगांना अर्थार्जन शक्य नाही, त्यांना या सार्वजनिक खर्चाअंतर्गत आजवर कल्याणकारी राज्यातर्फे भत्ता मिळत असे. हे बजेट आता लक्षणीय प्रमाणात कमी करण्यात येत आहे. त्यामुळे सरकारविरुद्ध असंतोष आहेच. हा भत्ता लायक अपंगांना मिळतो का नाही याची तपासणी करण्याचे कंत्राट सरकारने ATOS कडे दिले आहे. त्यानुसार ATOS भत्ता घेणाऱ्या व घेण्यास अर्ज करणाऱ्या सर्व अपंगांची वैद्यकीय तपासणी करते व कोणते अपंग खरोखरच काम करू न शकण्याइतके अपंग आहेत हे सरकारला कळवते. पण या तपासणीत व त्यामुळे सरकारला होणाऱ्या शिफारशीत अनेक चुका झाल्याचे आढळले आहे. ज्या अपंगांना काम करणे अशक्य आहे, तेही काम करू शकतील असे ATOS ने सरकारला कळवले व सरकारने अशांचे भत्ते कमी तरी केले किंवा बंद तरी केले. एका अभ्यासानुसार गेल्या वर्षीच्या ९ महिन्यांच्या कालावधीत ATOS च्या सांगण्यावरून ज्या अपंगांचा भत्ता बंद झाला, त्यातील ११०० जण विकार आणि उपासमार यामुळे मरण पावले. काहींनी आत्महत्याही केल्या. या संदर्भात सेसिलिया बर्न्स (Cecilia Burns) या महिलेचे उदाहरण पाहण्यासारखे आहे. ५१ वर्षांच्या या महिलेला स्तनाचा कॅन्सर होता. ती काम करायला सक्षम आहे असा निर्वाळा मिळाल्यामुळे तिचा भत्ता जवळजवळ बंदच करण्यात आला. या कपातीविरुद्ध सार्वजनिक निषेध झाल्याने कपात रद्द होऊन आधीच्या इतका भत्ता मंजूर झाला. दरम्यान तिची तब्येत इतकी खालावली की २७ ऑगस्टला ती मरण पावली.

या पार्श्वभूमीवर एकीकडे पॅरालिंपिक्स आयोजन करणे व दुसरीकडे अपंगांना त्यांचे हक्क नाकारणे हा ATOS चा दुटप्पीपणा संतापजनक ठरला. त्याच्या निषेधार्थ अपंग व सक्षम इतरांनीही लंडनमध्ये मोठा मोर्चा काढला. हा मोर्चा ATOS च्या ऑफिसवरून सरकारच्या अपंगकल्याण ऑफिसवर गेला. अपंगांची प्रमुख तक्रार

अशी की आम्ही सरकारी खर्चावर जगतो अशी आमची नाचक्की करण्यात येत आहे. करदात्यातीलही विशेषत: खालचा वर्ग आमच्याविरुद्ध उठत आहे. आधीच असह्य शारीरिक, मानसिक व आर्थिक क्लेश असताना या सरकारी धोरणाने भीती, अनिश्चितता, काळजी अशी नको ती भर क्लेशांमध्ये पडली आहे. मागील वर्षी ATOS ने साडेसात लाख अपंगांची अर्हतेसाठी वैद्यकीय तपासणी केली. त्यातील ४०% अपंगांनी ATOS च्या निर्णयाविरुद्ध अपील केले. त्यातील ३८% अपंगांचे अपील यशस्वी झाले. म्हणजे साडेसात लाखातील एक लाखाहून जास्त अपंगांच्या निदानाबद्दल ATOS ने चूक केली होती. तेव्हा पॅरालिंपिकतर्फे अपंग किती समर्थ आहेत हे दाखवण्याचा ATOS ला नैतिक अधिकार नाही व असे धोरण राबवणाऱ्या सरकारला तर नाहीच नाही अशी अपंगांची भूमिका आहे व त्याला जनमताचाही पाठिंबा आहे. ३ सप्टेंबरला एका खेळाच्या पारितोषिक वितरणासाठी या धोरणाचा शिल्पकार ब्रिटनचा अर्थमंत्री ओस्बोर्न (Osborne) पॅरालिंपिकला गेला. त्याचे नाव घोषित होताच स्टेडियममधील ८०,०४० प्रेक्षकांनी त्याच्या निषेधाच्या घोषणा चालू केल्या. इकडे राजकारण्यांच्यात सार्वजनिक शरम थोडीफार तरी शिल्लक असल्याने ओस्बोर्नची मान खाली गेली.

पॅरालिंपिकवरचा आणखी एक आक्षेप म्हणजे फक्त इच्छाशक्ती, आर्थिक मदत व प्रशिक्षण मिळाले तर कोणताही अपंग त्या उंचीपर्यंत जाऊ शकतो हा भ्रम समाजात निर्माण होतो. तो भ्रमच आहे कारण कित्येक विकार माणसाला इतके पंगू करतात की स्पर्धांचे खेळ सोडाच, सामान्य जीवनही या व्याधिग्रस्तांना अशक्यप्राय होते. पण समाज त्यांना आळशी ठरवतो, वर म्हटल्याप्रमाणे त्यांना मिळणारा सरकारी भत्ता मुख्य प्रवाहाला खुपतो कारण पॅरालिंपिकमध्ये अपंग काय कर्तृत्व दाखवू शकतात हे समोर असते.

पुढचा मुद्दा म्हणजे अपंगांमध्येही पॅरालिंपिकपर्यंत पोचणारे अपंग 'आहे रे' गटातील आहेत. एखाद्या खेळात अपंगाला भाग घेण्यासाठी आवश्यक असणारे कृत्रिम अवयव महाग असतात. उदाहरणार्थ एक हात नसलेल्याचा शरीराचा तोल सांभाळणे हे तांत्रिकदृष्टचा अतिशय कौशल्याने बनवलेले अवयव मिळाल्याखेरीज अशक्य असते. या अपंगांना असे कृत्रिम अवयव मिळणे, सरावाच्या सोयी असणे, दीर्घ प्रशिक्षण मिळणे हे त्या-त्या देशातील सरकारी मदतीने व त्यांच्या स्वत:च्या आर्थिक परिस्थितीने शक्य होते. दुसऱ्या बाजूला इतर अपंगांच्या जगण्याच्या साध्या सवलतीही काढून घेतल्या जात आहेत.

**सामाजिक दृष्टिकोन**

एक बोलका प्रसंग पॅरालिंपिक्सदरम्यान घडला. डेव्हिड ब्लंकेट हा एक माजी केंद्रीय मंत्री जन्मांध आहे. अंध लोकांबरोबर विशिष्ट प्रशिक्षण घेतलेला गाईड कुत्रा कायम असतो. ब्लंकेट पॅरालिंपिक्स पहायला कुत्र्यासमवेत आला. त्याला प्रवेश नाकारण्यात आला. या समाजालाही किती अंतर काटायचे आहे हे यावरून लक्षात यावे. निदान बसस्टेशन, लायब्ररी, रेल्वे स्टेशन, शौचालये अशा बहुतेक सार्वजनिक ठिकाणी व्हीलचेअरवरून अपंग जाऊ शकेल अशा सुविधा येथे उपलब्ध असतात. आपल्याकडे तर धडधाकट माणूस जायबंदी होईल अशी अगदी शहरी रस्त्यांची दशा असते. मग बृहत समाजाचा अपंगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हेटाळणी, तुच्छता, समान संधी नाकारणे व प्रसंगी वाळीत टाकणे इथपर्यंत असतो. पॅरालिंपिक्सचा धडा हा की हा दृष्टिकोन तरी बदलावा. आपल्याकडच्या सेसिलिया बर्न्सची संख्या तर लाखात जाईल. इथे एका सेसिलियावर अन्याय झाला तर आवाज होतो, एका माजी केंद्रीय मंत्र्याला प्रवेश नाकारला जाऊ शकतो तर वर्तमान अर्थमंत्र्यांचा सार्वजनिक अवमानही होऊ शकतो. पॅरालिंपिक्सशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या या गोष्टीही भारतीय समाजाच्या अपरिपक्वतेवर प्रकाश टाकतात.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*